11-04-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/10/2025 10:15 PM Page 1



## निवडक

### दवर्ली आके येथील हनुमान जयंतीनिमित्त आजपासून विविध कार्यक्रम



■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १०** : दवर्ली आके येथील श्री मारूती मंदिरात शुक्रवार दि. ११ वाजता शनिवारी दि. १२ रोजी श्री हनुमान जयंती विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. दि. ११ रोजी सकाळी श्रीस अभिषेक, गंध पूजा, आरती व प्रसाद होईल. शनिवार दि. १२ रोजी सकाळी ७ वाजता श्री हनुमान जन्मोत्सव, पाळणा, पुराण. आरत्या व प्रसाद होईल. दुपारी १२.३० वाजता आरती व महाप्रसाद होईल. हा महाप्रसाद सिद्धार्थ आनंद नाईक व कुटुंब यानी अर्पण केला आहे. सायंकाळी श्रीची सजवलेल्या वाहनातून नगर प्रदक्षिणा होईल. सांयकाळीं ५.३० वाजता मंदिरांतून मिरवणूक निघेल. या दिंडीत गोमंतकांतील भजनी कलाकार अशोक कोनाडकर यांच्या नेतृत्वाखाली मारूती मंदिरातील भजनी मंडळ भाग घेणार आहेत. ही मिरवणूक विद्यूत भवन जवळून, आके तळेबांध येथील राम मंदिर, तिंबलो निवासजवळून, तीर्थरूपा, विद्यानगर जंक्शन व तेथून परत श्री मारुती मंदिरांत रात्री ११ वाजता पोहोचेल. वाटेत भाविक थांबून आरती ओवाळून स्वागत करतात. या कार्यक्रमला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे व श्रीचे आशीर्वाद घ्यावेत, असे मारूती मंदिर समितीचे अध्यक्ष भाई नायक यांनी कळविले आहे.

---

### नाणूस फिडरवर आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १०** : शुक्रवार दि.११ एप्रिल रोजी सकाळी ९.३० ते दुपारी ३ वा. यावेळेत ११ केव्ही नाणूस फिडरवर वीज वाहिन्याना लागणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडायच्या असल्याने तसेच वीज वाहिन्यांचे देखभालीचे काम करायचे असल्याने बाये सुर्ला, वेळगे बाजार, रुमड वेळगे, वंडामळ वेळगे, जोशीभट ट्रान्सफॉर्मर, गाववाडा वेळगे, श्रीमती हायस्कुल ट्रान्सफॉर्मर व परिसरात वीजपुरवठा खंडित करण्यात येणार असून यावेळी ग्राहकांनी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### पॉल बार्रेटो बिल्डिंग फिडरवर उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १०** : ११ केव्ही पॉल बार्रेटो बिल्डिंग फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शनिवार दि. १२ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत पॉल बार्रेटो बिल्डिंग आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे तांबेटी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. १२ रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत तांबेटी भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### कासावली फिडवर उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**कासावली, दि. १०** : ११ केव्ही कांसावली फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शनिवार दि. १२ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत रझवोइर, फालवाडो, बोरसुले आणि ओसोइलेन भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे ११ केव्ही कुंकळी औध्योगिक फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने रविवार दि. १३ रोजी सकाळी ८.३० ते संध्या ५.३० वाजेपर्यंत संपूर्ण कुंकळी औध्योगिक वसाहत भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### ड्रोन रिमोट सेन्सिंग आणि जीआयएसवर कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १०** : आसगाव येथील आग्नेल टेक्नॉलॉजी आणि डिझाईन संस्थेच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक इंजिनिअरिंग विभागाने सांखळी येथील सरकारी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सहकार्याने ड्रोनमध्ये रिमोट सेन्सिंग आणि जीआयएस या विषयावर पाच दिवसांचा फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमास आसगांव येथील आग्नेल तांत्रिक शिक्षण संस्थेचे सहाय्यक संचालक रेव्ह फादर विकी हिलारियो आणि उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक श्री भूषण के. सावईकर, प्रा. डॉ. नियान मार्चन, आग्नेल टेक्नॉलॉजी आणि डिझाईन संस्थेचे प्राचार्य श्री. लक्ष्मीकांत बोर्डेकर, कला आणि वाणिज्य महाविध्यालयाचे प्रभारी प्राचार्य नामदेव गावस उपस्थित होते. स्पेशल क्राफ्ट संस्थेचे संस्थापक आणि जिओस्पेशल सल्लागार माल्कम अफोंसो, बंगळुरू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्रा. होने गौडा, बेंगळुरूच्या प्रेसिडेन्सी विध्यापिठाचे डॉ चिंतामणी पै, गरुड एरोस्पेसचे डॉ. पी. आनंद आणि हिरेन गाब्रियल हे प्रमुख संसाधन व्यक्ती होते. कार्यक्रमाचे संयोजन सिद्धांत जल्मी आणि श्रीमती अक्षरा नाईक, मॅग्नोलिया ऑरिया मिरांडा आणि ब्रह्मानंद सावंत यांनी केले. प्राध्यापक विकास कार्यक्रम उच्च शिक्षण संचालनालयाने प्रायोजित केला होता. या कार्यक्रमास महाविध्यालयांचे २५ शिक्षक सहभागी झाले होते.

---

### बाहेरीलवाडा येथे उद्या 'ऋतुमती हरण' नाटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १०** : बाहेरीलवाडा केरी – सत्तरी येथे श्रीहनुमान मंदिराच्यावतीने शनिवार दि. १२ रोजी रात्री ११ वाजता हनुमान जन्मोत्सवानिमित्त श्री शंकरनाथ मठाच्या प्रांगणात चेंदवणकर गोरे पारंपरिक दशावतार नाट्यमंडळाचे नवीन दर्जेदार नाटक 'ऋतुमती हरण' सादर करण्यात येणार आहे. या नाटकात शरद नाईक, विश्वजित परब, अजिंक्य गवस, गुरुनाथ मेस्त्री, पांडू तांडेल, काका मेस्त्री, राहुल परब, मंगेश लाड, स्वप्नील नाईक, बाबलो शेटकर व संदेश शिवलकर यांच्या भूमिका आहेत. या नाट्य प्रयोगास रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री हनुमान मंदिर कार्यकारिणी मंडळ बाहेरीलवाडा यांनी केले आहे.

---

### कामुर्ली येथे उद्या हनुमान जयंती उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १०** : श्री प्रभू पंचायतन संस्था वागाळी कामुर्ली येथील श्री प्रभू मंदिर वागाळी कामुर्ली येथे श्री हनुमान जयंती उत्सव शनिवार दि. १२ रोजी साजरा करण्यात येणार आहे पहाटे ६.१० वाजता हनुमान जन्म सोहळा त्यानंतर पाळणा गीत आरती व तीर्थप्रसाद सकाळी ८ वाजता सगुण रघुनाथ प्रभू यांचे घरी श्रीची लालखी मिरवणूक प्रयाण होईल. ४ वाजता राष्ट्रीळी प्रभू पंचायत महिला मंडळ दिंडी पदकाचा भजनाचा कार्यक्रम संध्याकाळी सात वाजता दिंडीचे गजरासह मारुतीरायाची पालखी मिरवणूक प्रभू मंदिरात प्रयाण होईल. ८ वाजता नामदेव वायगणकर व साई गंगा आर्ट्स पुरस्कृत दशावती नाटक मारुतीचे लग्न सादर करते सिद्धेश्वर पारंपरिक दशावतारी नाट्य मंडळ दोडामार्ग.

---

### सावईवेरे येथील अनंत देवस्थानात उद्या हनुमान जयंती उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे दि. १०** : सावईवेरे येथील श्री अनंत देवस्थानात हनुमान जयंती उत्सव शनिवार दि. १२ रोजी विविध धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त सकाळी देवस्थानात धार्मिक विधी, रात्री ९ वाजता आरती, तीर्थप्रसाद, रात्री १० वाजता सावईवेरे ग्रामस्थांच्या सौजन्याने देवी माऊली दशावतारी नाट्य मंडळ डोंगरपाल – सावंतवाडी यांचा दशावतारी नाट्यप्रयोग होईल. तरी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकातर्फे करण्यात आले आहे.

---

# म्हादई नदी वळवण्याविरोधातला लढा तीव्र करणार

## 'सेव्ह म्हादई सेव्ह गोवा फ्रंट'ची नाराजी : शेतीचे मोठे नुकसान होऊ शकते

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. १० :** म्हादई नदीच्या प्रस्तावित वळवण्याच्या निर्णयावर 'सेव्ह म्हादई सेव्ह गोवा फ्रंट'ने गुरुवारी तीव्र नाराजी व्यक्त केली. या निर्णयामुळे पश्चिम घाटाचे वाळवंटीकरण होण्याची शक्यता असून खानापूर परिसरातील शेतीचे मोठे नुकसान होऊ शकते, असा इशारा या संघटनेने दिला आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना इतिहासकार आणि सेव्ह म्हादई सेव्ह गोवा फ्रंट चे सदस्य प्रजल साखरदांडे म्हणाले की, कर्नाटक सरकारची भूमिका आता उघड झाली आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या वारंवार पंतप्रधानांकडे जाऊन हुबळी–धारवाड जिल्ह्यांसाठी पिण्याच्या पाण्याची मागणी करतात. मात्र, कुणकुंबी भागातील लोकांचे काय? त्यांच्या पाण्याच्या गरजा लक्षात घेतल्या जात नाहीत. कर्नाटक सरकार त्यांच्या स्वतःच्या राज्यातील या नागरिकांसाठी जबाबदार नाही का?

ते पुढे म्हणाले की , यासंदर्भात अनेक आंदोलने झाली आहेत, पण परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. पर्यावरणाचा आणि शेतीचा मोठा ऱ्हास होण्याची शक्यता आहे. त्यांनी आधीच धरण उभारले असून कळसा प्रकल्प पूर्ण झाला आहे. आता ते भंडुरा प्रकल्पावर लक्ष केंद्रित करत आहेत. खानापूरमधील नागरिकही या निर्णयाविरोधात आवाज उठवत असून पाणी वळवले जाऊ नये अशी मागणी करत आहेत. गोवा सरकारने याची गांभीर्याने दखल घ्यावी.

महेश म्हांब्रे यांनी गोव्यातील पाणीपुरवठ्याच्या गंभीर स्थितीकडे लक्ष वेधले. मुख्यमंत्री प्रमोद सावंत चार तास पाणीपुरवठा केला जाईल, असे म्हणतात. मात्र, माजी मुख्यमंत्री दिवंगत मनोहर पर्रीकर यांनी १२ तास पाणी देण्याचे आश्वासन दिले होते. हे १२ तास आता चार तासांवर आले आहेत आणि प्रत्यक्षात हे चार तासही पाणी मिळत नाही. हा केवळ गोव्याच्या अस्तित्वाचा प्रश्न नाही, तर संपूर्ण पश्चिम घाटाच्या भविष्यासाठी धोक्याचा इशारा आहे,असे त्यांनी सांगितले.

अधिवक्ता हृदयनाथ शिरोडकर यांनी या संपूर्ण प्रकरणामागे स्टील लॉबीचा मोठा हस्तक्षेप असल्याचा आरोप केला. पूर्वी ऊस लॉबी होती, आता स्टील लॉबीने सरकारांना विकत घेतले आहे. पिण्याच्या पाण्यासाठी हा प्रकल्प राबवला जात असल्याचा दावा केला जातो, पण प्रत्यक्षात त्यामागे औद्योगिक स्वार्थ आहे. या लॉबींच्या फायद्यासाठी म्हादईचा बळी दिला जात आहे, असे ते म्हणाले.

सेव्ह म्हादई सेव्ह गोवा फ्रंट, गोवा बचाओ अभियान, आणि खानापूर बचाओ समिती यांनी एकत्रित येऊन म्हादईच्या पाणीवळवणीविरोधात केंद्र सरकारकडे तातडीने निवेदन सादर करावे, अशी मागणी केली आहे. गोव्याच्या भविष्यासाठी आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी हा लढा आणखी तीव्र केला जाईल, असे आंदोलकांनी स्पष्ट केले.

---

# रेंट–ए–कॅब असोसिएशनची वाहतूक अधिकाऱ्यांकडे कैफियत

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. १०** : ऑल गोवा रेंट–ए–कॅब असोसिएशनच्या सदस्यांनी कार बदल, वाहतूक नियम, तसेच रेंट–ए–कॅब व्यवसायातील अडचणींवर चर्चा करण्यासाठी सहाय्यक वाहतूक संचालक लाडू गावकर यांची भेट घेतली.

असोसिएशनचे उत्तर गोवा अध्यक्ष रामदास पालकर यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, परवानग्या बदलणे व नूतनीकरण करण्याची प्रक्रिया थांबवण्यात आली आहे. आम्हाला प्रत्येक १२ वर्षांनी परवानग्या नूतनीकरण कराव्या लागतात आणि वाहने बदलावी लागतात, मात्र सध्या ही प्रक्रिया ठप्प झाली आहे. अशा परिस्थितीत आम्ही काय करावे? व्यवसाय बंद करावा का? सरकार ज्या प्रकारचे नवीन नियम लागू करत आहे, ते व्यवसायासाठी अडथळा ठरत आहेत.

उत्तर गोवा रेंट–ए–कॅब असोसिएशनचे उपाध्यक्ष नितेश चोडणकर यांनीही संताप व्यक्त करत सांगितले की, मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी आम्हाला ग्वाही दिली होती की बदल आणि नूतनीकरण सुरू होईल. काही दिवसांसाठी नूतनीकरण सुरु झाले, मात्र वाहतूक मंत्र्यांच्या हस्तक्षेपानंतर ही प्रक्रिया पुन्हा थांबली.

चोडणकर यांनी वाहनांवरील नवीन नियमावलीबाबतही आक्षेप घेतला. आमच्यावर स्पीड गव्हर्नर आणि वाहन स्थान ट्रॅकिंग डिव्हाईस बसवण्याची सक्ती केली जात आहे. आधीच वाहने ट्रॅकरसह येत असताना, नवीन डिवाईस बसवण्याची गरज काय? त्याचा खर्च जवळपास १२ हजार असून, वार्षिक नूतनीकरणासाठी १४ हजार भरावे लागतात. याशिवाय, एकवेळचा रोड टॅक्स लागू करण्यात आला आहे, जो आम्ही याआधी वार्षिक स्वरूपात भरत होतो.

त्यांनी नवीन ट्रॅफिक चलन नियमांचाही विरोध केला. नवीन नियमानुसार, जर चालकाने वाहतूक नियम मोडला तर दंडाची नोटीस थेट गाडी मालकाच्या घरी जाईल. मात्र, तोपर्यंत संबंधित ग्राहक कधीच परत गेलेला असेल आणि तो दंड भरणार नाही. जर महिन्यात तीन–चार वेळा अशी परिस्थिती निर्माण झाली, तर आमचा व्यवसायच संपुष्टात येईल.

परिवहन संचालनालयाने अलीकडेच घेतलेल्या निर्णयानुसार, नवीन रेंट–ए–कॅब परवान्यांची प्रक्रिया थांबवण्यात आली आहे. यासंदर्भात जारी केलेल्या सार्वजनिक सूचनेत नवीन अर्ज स्वीकारले जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, रेंट–ए–कॅब चालकांनी मोपा आंतरराष्ट्रीय विमानतळावर पर्यटक टॅक्सी चालकांकडून होणाऱ्या गैरवर्तनाचा आरोप केला आहे. काही स्थानिक टॅक्सी चालक पर्यटकांवर जबरदस्ती करत असल्याचा आरोप करत त्यांनी एका घटनेचा उल्लेख केला, जिथे रेंट–ए–कॅबमधील पर्यटक कुटुंबाचे सामान अन्य टॅक्सी चालकांनी जबरदस्तीने काढून स्वतःच्या वाहनात ठेवले आणि त्यांना त्यांच्या टॅक्सीत जाण्यास भाग पाडले.

पर्यटकांना त्यांच्या पसंतीनुसार वाहतूक सेवा निवडण्याचा अधिकार आहे. आम्हाला कोणत्याही टॅक्सी चालकांचा विरोध नाही, पण विमानतळावर काही टॅक्सी चालक स्थानिक असल्याच्या नात्याने वर्चस्व गाजवत आहेत. आमच्या वाहनांना अडवण्याचा अधिकार त्यांना कोणी दिला? ते आरटीओ आहेत की पोलिस? असा संतप्त सवाल चोडणकर यांनी उपस्थित केला.

---

# बोंडला प्राणीसंग्रहालय बंदप्रकरणी विभागीय चौकशीचे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १०** : बोंडला प्राणीसंग्रहालयाच्या तात्पुरत्या बंदप्रकरणी विभागीय चौकशीचे आदेश देण्यात आल्याची माहिती गोव्याचे वनमंत्री विश्वजित राणे यांनी बुधवारी दिली.

राज्य सचिवालयात पत्रकारांशी मंत्री राणे म्हणाले की, या संदर्भात आधीच कठोर सूचना देण्यात आल्या आहेत. मी विभागीय चौकशीचे आदेश दिले असून, याबाबत मुख्यमंत्र्यांना माहिती दिली आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षकांनी संपूर्ण प्रकरण आपल्या हाताळणीस घेतले आहे.

बोंडला वन्यजीव अभयारण्यात वसलेले गोव्यातील एकमेव प्राणीसंग्रहालय सध्या तात्पुरते बंद ठेवण्यात आले आहे. तीन सिव्हेट मांजरी आणि दोन जंगली मांजरींच्या संशयास्पद विषाणू संसर्गामुळे झालेल्या मृत्यूनंतर हा निर्णय घेण्यात आला. यासंबंधी अधिकृत माहितीप्रमाणे, हे मृत्यू ६ ते ९ मार्च दरम्यान झाले. मात्र, खबरदारीचा उपाय म्हणून ३० मार्च रोजी प्राणीसंग्रहालय परिसर क्वारंटाइन करण्याचा आदेश जारी करण्यात आला आणि १ एप्रिलपासून ते जनतेसाठी बंद ठेवण्यात आले. केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, एका पेक्षा अधिक प्राणी मृत्युमुखी पडल्यास १५ दिवसांसाठी विशेष दक्षता बंधनकारक असते.

वनमंत्री राणे यांनी या प्रकरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली आणि सांगितले की, संशयास्पद विषाणू संसर्गामुळे प्राण्यांच्या मृत्यूनंतर प्राणीसंग्रहालय बंद करण्याची माहिती विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना दिलीच नव्हती. मी यासंबंधी स्पष्टीकरण मागवले आहे आणि जबाबदार अधिकाऱ्यांविरोधात कारवाई केली जाईल. या घटनेच्या सखोल चौकशीसाठी मी अहवाल मागवला असून, लवकरच आढावा बैठक बोलावणार आहे. या बैठकीनंतर मी मुख्यमंत्र्यांना संपूर्ण अहवाल सादर करेन. संबंधित अधिकाऱ्याने मला माहिती का दिली नाही, याचा तपास करून कठोर कारवाईची मागणी करणारे पत्रही मुख्यमंत्र्यांना पाठवणार आहे, असे राणे यांनी स्पष्ट केले.

वन विभागाने अधिक सतर्क राहण्याची आवश्यकता आहे. वनमंत्र्यांना कोणतीही माहिती न देता प्राणीसंग्रहालय बंद करणे हे पूर्णपणे अस्वीकार्य आहे. हे माझे खाते आहे आणि माझी जबाबदारी आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाचा सखोल आढावा घेतला जाईल, असे त्यांनी ठाम शब्दांत सांगितले.

वन अधिकाऱ्यांनी वातानुकूलित केबिनमध्ये न बसता प्रत्यक्ष क्षेत्रात कार्यरत राहावे, अशी ठाम भूमिका मंत्री राणे यांनी मांडली. तसेच, गोव्यातील खारफुटी परिसंस्था आणि पर्यावरण संतुलनाच्या संरक्षणासाठी सरकारने ठोस पावले उचलण्याचा निर्धार केला आहे.

राणे यांनी सांगितले की, सुमारे ३,५०० खारफुटीशी संबंधित सर्वेक्षण क्रमांकांचे तपशीलवार सर्वेक्षण करण्याचे निर्देश प्रधान मुख्य वनसंरक्षक यांच्या नेतृत्वाखालील वन विभागाला देण्यात आले आहेत. खारफुटीच्या नोंदींचे अचूक मॅपिंग करणे आवश्यक आहे, कारण अनेकदा लोक खारफुटी वाढविल्या जाणाऱ्या भागात भराव टाकतात आणि नंतर असे दर्शवतात की तेथे पूर्वीपासूनच खारफुटी नव्हती, असे त्यांनी स्पष्ट केले.

वनमंत्र्यांनी स्पष्ट इशारा दिला की, संरक्षित क्षेत्रांमध्ये कोणतेही अतिक्रमण अथवा अनधिकृत कृती सहन केली जाणार नाही. संरक्षित क्षेत्राच्या मर्यादा उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल,असे त्यांनी ठामपणे सांगितले.

---





# आगोंद येथे गटारात सांडपाणी सोडणाऱ्या विरुद्ध करणार कारवाई

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १०** : मासे विक्रेत्यांजवळील पार्वे ड्रेनेजची आरोग्य विभागाचे प्रणय नाईक, डॉ. दिवाकर, विकास पागी यांच्यासह सरपंच नीलेश पागी, प्रभाग सदस्य प्रीतल फर्नांडिस, सचिव अमोल यांनी पाहणी केली. स्थानिक नाल्याला जोडलेले सर्व सांडपाणी पाईप काढून टाकण्याचे निर्देश यावेळी दिले. तसेच मासे विक्रेत्यांना ड्रेनेजमध्ये सांडपाणी टाकणे थांबवण्याचे निर्देश दिले. अन्यथा आरोग्य कायद्याअंतर्गत कठोर कारवाई संबंधीता विरुद्ध केली जाईल असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

---

# चार दुकानांत घरफोडी; तीन आरोपी अटकेत

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी: शहरातील चार दुकानांमध्ये घरफोडी करून १.६० लाख रुपयांहून अधिक रोख रक्कम आणि मोबाईल फोन चोरणाऱ्या तिघांना पणजी पोलिसांनी जलदगतीने कारवाई करत अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक आरोपींची ओळख मुस्तकीन दासना, मोहम्मद हमेद मुसाहिद उर्फ गबारू आणि मोहम्मद चोटे अशी असून, ते तिघेही उत्तर प्रदेशचे रहिवासी आहेत. महाराष्ट्रातील कोल्हापूर येथे बसमध्ये चढत असताना त्यांना ताब्यात घेण्यात आले.

शहरातील रिबेरो बिल्डिंगमधील डब्ल्यू फॉर वुमन स्टोअर, कॅफे टाटोजजवळील मन्सूर एंटरप्रायझेस, पणजी म्युनिसिपल गार्डनजवळील कासा बॅरेटो आणि जोस फाल्काओ रोडवरील आराध्या वाईन स्टोअर्स या चार दुकानांमध्ये घरफोडी झाल्याची तक्रार पोलिसांकडे दाखल झाली होती.

पणजी टाउन पोलिसांनी स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने तसेच गुप्तचर यंत्रणेच्या सहाय्याने माहिती गोळा केली. गुन्ह्याची माहिती मिळाल्यानंतर अवघ्या चार तासांच्या आत आरोपींना कोल्हापूर येथे अटक करण्यात आली.

पोलिसांच्या तपासानुसार, आरोपींनी डब्ल्यू फॉर वुमन स्टोअरचे शटर वाकवून आणि काच फोडून आत प्रवेश केला व ११,००० रुपये लंपास केले. मन्सूर एंटरप्रायझेस मधून सुमारे १.५० लाख रुपयांची रोकड लुटली. तसेच, आराध्या वाईन स्टोअर्स मधून ३,४७० रुपये रोख व १०,००० रुपये किमतीचा ओप्पो मोबाईल फोन, तर कासा बॅरेटो मधून ५,००० रुपये रोख रक्कम चोरी केली. या गुन्ह्याच्या तपासात पणजी पोलीस ठाण्याचे पीआय विजयकुमार चोडणकर आणि त्यांच्या पथकाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. ही संपूर्ण कारवाई एसडीपीओ (पणजी) सुदेश नाईक आणि उत्तर गोव्याचे पोलीस अधीक्षक अक्षत कौशल (आयपीएस) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये, पणजीतील साओ टोम परिसरात चोरीच्या अनेक घटना घडल्या होत्या, ज्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्या वेळी अज्ञात चोरट्याने तीन कॅफे आणि एका बारमधून रोख रक्कम तसेच मौल्यवान वस्तू चोरल्या होत्या. त्यानंतर स्थानिकांनी सुरक्षा उपाययोजना वाढवण्याची मागणी केली होती. या ताज्या घटनेनंतर पणजीतील सुरक्षा व्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पोलिसांनी गस्त वाढवण्याची गरज असल्याचे नागरिकांनी म्हटले आहे.

---

# बेतोडा शाळेच्या विद्यार्थ्यांना मैदानच नाही

■ टीम दैनिक हेराल्ड



फोंडा, दि. १० : बेतोडा सरकारी शाळेच्या विद्यार्थ्यांना खेळाच्या मैदानाचा अभाव भासतो आहे. नव्या शाळेची इमारत उभी राहून तब्बल दहा वर्षे उलटली असली तरी विद्यार्थ्यांना अद्याप खेळण्यासाठी स्वतंत्र मैदान मिळालेले नाही. स्थानिकांच्या मते, २०१४ मध्ये शाळेच्या खेळाच्या मैदानासाठी राखीव असलेल्या जागेवरच नवीन इमारत बांधण्यात आली, परिणामी विद्यार्थ्यांना नवी इमारत मिळाली, मात्र खेळाचे मैदान गमवावे लागले.

पालकांनी आता नवीन इमारतीला लागून असलेली जीर्ण अवस्थेतील जुनी इमारत पाडून त्या जागेवर खेळाचे मैदान विकसित करण्याची मागणी केली आहे. पालकांचे म्हणणे आहे की, विद्यार्थ्यांकडे खेळातील कौशल्य दाखवण्यासाठी जागा नाही. तसेच, ही जीर्ण इमारत धोकादायक स्थितीत असल्यामुळे ती त्वरित पाडणे आवश्यक आहे. जर ही जुनी इमारत पाडण्यात आली तर शाळेला मोठे मैदान उपलब्ध होईल. मात्र, सध्या विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी एक किलोमीटर दूर जावे लागते, असे स्थानिकांनी स्पष्ट केले.

बेतोडा सरपंच मधू खांडेपारकर यांनी यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा सुरू असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना खेळाचे मैदान मिळावे यासाठी आम्ही जुनी शाळेची इमारत लवकरात लवकर पाडण्याच्या हालचाली करत आहोत,असे त्यांनी स्पष्ट केले.

पालक–शिक्षक संघ सदस्य अंकुश कुंकळीकर यांनीही याआधी शिक्षण संचालनालयाकडे ही इमारत पाडण्याची मागणी केली होती. सरकारकडून परवानगी मिळूनही अद्याप इमारत धोकादायक स्थितीत आहे, जी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी मोठा धोका निर्माण करू शकते, असे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि खेळासाठी पोषक वातावरण मिळावे, यासाठी स्थानिक तसेच पालक प्रयत्नशील आहेत. प्रशासनाने तातडीने पावले उचलून ही जुनी इमारत पाडून खेळाचे मैदान उपलब्ध करून द्यावे, अशी विद्यार्थ्यांच्या पालकांची आणि स्थानिकांची मागणी आहे.